पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३
सुविचार - वेळ हा अमूल्य आहे, प्रत्येक क्षणाला मोल द्या.
आज जे काही करू शकता ते उद्यासाठी ढकलू नका.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७६,९४४.२८ | -१२.९९ -०.०२% |
| डॉलर | ₹ ९४.९२ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | २३ |
| दिल्ली | ३४ | २५ |
| मुंबई | ३२ | २७ |
| नागपूर | ३० | २४ |
| पुणे | २९ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ | वर्ष २ रे | अंक २९२ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:१२ संध्या-६:४४

सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,०००/- २,३३,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# मोदी मंत्रिमंडळात लवकरच मोठा फेरबदल

## दिग्गजांची धाकधूक वाढली; महाराष्ट्रातून श्रीकांत शिंदेंची लॉटरी लागणार?



- खराब कामगिरी असलेल्या मंत्र्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे
- कामकाजात वय अडथळा ठरत असलेल्या काही मंत्र्यांना डच्चू मिळू शकतो
- जेन-झी च्या दबावाचा विचार करूनही मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
- या फेरबदलात ५० वर्षांपेक्षा कमी वयाच्या युवा चेहऱ्यांना तसेच महिला महिलांना संधी मिळू शकते.

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात जेव्हा जेव्हा फेरबदलाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होते, तेव्हा बिहारमधील अनेक दिग्गजांची धाकधूक वाढते, तर काहीजणांच्या मंत्रिपदाच्या आशा पल्लवीत होतात. नवभारत या वृत्तवाहिनेने दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात विस्तार होण्याची शक्यता आहे. या फेरबदलात आता कोणाला डच्चू मिळतो आणि कोणाला संधी मिळते हे येणारा काळच सांगेल. मात्र मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चेने बिहारमधील अनेक नेत्यांची चिंता वाढली आहे.**

केंद्रीय मंत्रिमंडळात सप्टेंबरच्या सुरुवातीला मोठा विस्तार आणि फेरबदल होण्याची शक्यता असल्याची चर्चा भाजपच्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मंत्रिमंडळ विस्तारामागे काही महत्वाची कारणेही असल्याचे सांगितले जात आहे. संविधानानुसार केंद्रीय मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ८१ मंत्री असू शकतात. सध्या मंत्रिमंडळात १२ पदे रिक्त असून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात सध्या बिहारमधून एकूण ८ मंत्री आहेत. यामध्ये ४ कॅबिनेट मंत्री आणि ४ राज्यमंत्री आहेत. केंद्र सरकारमधील जलशक्ती मंत्रालयाचे राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांच्यावरही फेरबदलाची टांगती तलवार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या कामगिरीबाबतही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. मात्र, मंत्रिमंडळाचा अंतिम विस्तार आणि कोणाला संधी मिळणार किंवा कोणाला मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवला जाणार, याबाबतचा अंतिम निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे वरिष्ठ नेतृत्वच घेणार आहे.

### श्रीकांत शिंदे यांचे नाव चर्चेत

महाराष्ट्रात आगामी काळात होणाऱ्या राजकीय घडामोडी पाहता, महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून एका कॅबिनेट मंत्रिपदाची मागणी केली जात आहे, ज्यासाठी श्रीकांत शिंदे यांचे नाव चर्चेत आहे. मात्र, अद्याप महाराष्ट्रातील भाजप नेत्यांबाबत अंतिम निर्णय स्पष्ट झालेला नाही.

### कोणत्या नेत्यांवर फेरबदलाची टांगती तलवार?

बिहारच्या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळातील संभाव्य फेरबदलाबाबत काही नेत्यांची नावे चर्चेत आहेत. त्यामध्ये केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह आणि सध्या केंद्र सरकारमध्ये कोळसा व खाण राज्यमंत्री असलेले सतीश चंद्र दुबे यांची विशेष चर्चा आहे. केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांच्या वयाचा मुद्दा चर्चेत असून, त्यांच्या जागी विवेक ठाकूर यांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्याचप्रमाणे सतीश चंद्र दुबे यांच्या जागी राज्यसभा खासदार मनन मिश्रा यांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाऊ शकते, अशीही चर्चा आहे.

## थोडक्यात

### एकाच सामन्यात दोनदा मोडला वर्ल्ड रेकॉर्ड



**नवीदिल्ली ।** झिम्बाब्वेने नामिबियाचा ५ धावांनी थरारक पराभव केला खरा, पण या सामन्यात २०२१ साली प्रस्थापित झालेला एक आंतरराष्ट्रीय विक्रम या एकाच सामन्यात एकदा नव्हे, तर अवघ्या काही तासांच्या अंतराने दोनदा मोडीत निघाला. झिम्बाब्वेचे १०१ धावांवर ६ प्रमुख फलंदाज तंबूत परतले. संघ संकटात असताना सातव्या क्रमांकावर रयान बर्ल आणि ब्रॅड इव्हान्स ही जोडी मैदानात एकत्र आली. या दोघांनी अवघ्या ४८ चेंडूंत नाबाद ९४ धावांची वादळी भागीदारी रचत धावसंख्या २० षटकांत ६ बाद १९५ पर्यंत पोहोचवली. यासह त्यांनी २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या डॅनियल सॅम्स आणि मार्कस स्टॉइनिस यांनी न्यूझीलंडविरुद्ध केलेल्या ९२ धावांच्या सातव्या विकेटच्या विक्रमाला मागे टाकून नवा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला.

### कपड्यांच्या दरात मोठी वाढ होणार?



**नवी दिल्ली ।** यंदाच्या सणासुदीच्या काळात कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. कापूस आणि सूती धाग्याच्या दरात ६० टक्क्यांनी वाढल्या आहेत. कापसाचे दरही २८ टक्क्यांहून अधिक वाढले आहेत. त्यामुळे आगामी सणासुदीत किमती ५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता उद्योग क्षेत्राकडून व्यक्त केली जात आहे. सुमारे २५० रुपये किलो असलेला सूती धागा आता जवळपास ४०० रुपये किलोवर पोहोचला आहे. म्हणजेच ६० टक्के वाढ झाली आहे. कच्चा माल आणि इंधनाच्या वाढत्या खर्चामुळे वस्त्रोद्योगावरील दबाव आणखी वाढला आहे. कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार बाजारात शंकर आयसीसी-१५०, २८ काउंट कापसाचा दर आता १९,०६५ रुपये प्रति क्विंटल झाला आहे.

# समृद्धी महामार्गावरील लुटमारीचा ४८ तासांत छडा

वृत्तसंस्था । नाशिक



**मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वाहनधारकांना मारहाण करून लुटणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीला नाशिक पोलिसांनी धडक कारवाई करीत ४८ तासांत जेरबंद केले. धाराशिव येथे एकाचवेळी छापा टाकून सात जणांना ताब्यात घेण्यात आले.**

- २०० किमीचे सीसीटीव्ही तपासून सात जण जेरबंद
- एका कुटुंबाला लुटण्याची घटना घडली

दरोड्यातील सर्व संशयित हे धाराशिव जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्या फरार पाच साथीदारांचा शोध सुरू आहे. या कारवाईची माहिती नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली. २७ ऑगस्ट रोजी रात्री मलढोण शिवारात छत्रपती संभाजीनगर येथील एका कुटुंबाला लुटण्याची घटना घडली होती. मारुती सुझुकी मोटारीच्या चाकाखाली लोखंडी वस्तू फेकून त्यांची गाडी रोखण्यात आली. त्यानंतर ११ ते १२ जणांच्या (पान २ वर)

# पीओपी मूर्तींच्या विसर्जनाचा तिढा सुटला; गतवर्षीचे नियमच यंदाही कायम

वृत्तसंस्था । मुंबई

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तींच्या विसर्जनावरून निर्माण झालेला संभ्रम तूर्तास दूर झाला आहे.**



मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालापर्यंत गेल्या वर्षीचेच नियम लागू राहणार असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सहा फ ु टांपर्यंतच्या पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत, तर सहा फुटांपेक्षा उंच मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांत करता येणार आहे. पर्यावरण विभागाने मंगळवारी याबाबत परिपत्रक काढत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या वर्षी म्हणजे, १ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत होती. मात्र उच्च न्यायालयाच्या(पान २ वर)

# माजी मुख्यमंत्र्यांच्या भाचीचा घरात आढळला मृतदेह

वृत्तसंस्था । कोलकाता



**पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भाचीचा बिरभूम जिल्ह्यातील रामपूरहाट येथील घरात मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. बृष्टी मुखर्जी घटक (वय २८) यांचा मृतदेह मंगळवारी दुपारी त्यांच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीत आढळून आला.**

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह रामपूरहाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, शवविच्छेदन अहवालानंतर माहिती समोर येईल, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.कुटुंबीयांच्या माहितीनुसार, बृष्टी मुखर्जी गेल्या काही वर्षांपासून नैराश्याने त्रस्त होत्या आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# साखर कारखान्याकडून उसाचे चुकारे देण्यास टाळाटाळ

## त्रस्त शेतकरी १५ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करणार!

वृत्तसंस्था । मालेगाव

**ऊस दिल्यानंतर ८ महिने उलटूनही हक्काचे पैसे न मिळाल्याने रावळगाव येथील ‘एस.जी.एनर्जी’ या खाजगी साखर कारखान्याविरोधात बळीराजाचा आक्रोश अधिकच तीव्र झाला आहे. ‘बँकेचे कर्ज मंजूर झाले की मग उसाचे चुकारे अदा करू’ अशी अजब भूमिका घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक कोंडीत ढकलणाऱ्या कारखाना प्रशासनाने आता थेट संवादाचे दरवाजेच बंद केले आहेत. त्यामुळे त्रस्त झालेल्या पीडित शेतकऱ्यांनी सोमवारी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, १५ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.**



मालेगाव तालुक्यातील १५० हून अधिक शेतकऱ्यांनी गेल्या जानेवारी महिन्यात या कारखान्याला ऊस पुरवठा केला होता. ऊस देऊन ८ महिने झाले तरी शेतकऱ्यांना छदामही मिळालेला नाही. यापूर्वी चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांनी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात बैठक घेऊन कारखान्याला अल्टीमेटम दिल्यानंतर चाळीसगाव परिसरातील शेतकऱ्यांचे पैसे तातडीने अदा करण्यात आले होते. मात्र, मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या थकबाकीबाबत कारखाना प्रशासन सतत टाळाटाळ करत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

**कारखान्याला टाळे, अधिकारी गायब!**


रावळगाव येथील ‘एस. जे. शुगर’ कारखान्याच्या साईटवर गेल्यावर तेथे कुलूप लावण्यात आल्याचे धक्कादायक चित्र निदर्शनास येत आहे. कारखान्याच्या आवारात केवळ रखवालदाराव्यतिरिक्त कोणीही अधिकारी किंवा जबाबदार व्यक्ती भेटत नाही. हक्काच्या पैशांसाठी शेतकऱ्यांना वारंवार (पान २ वर)

# राहुल गांधींचा महाराष्ट्रातील ७८ काँग्रेस जिल्हाध्यक्षांसोबत ‘मार्शल आर्ट्स’ सामना

## राहुल गांधी यांच्यासोबत मार्शल आर्ट्सच्या सामन्याबाबत प्रशिक्षणार्थींमध्ये उत्सुकता

वृत्तसंस्था । नाशिक

**संघटन सृजन अभियानांतर्गत निवड झालेल्या राज्यातील काँग्रेसच्या ७८ नवनियुक्त जिल्हाध्यक्षांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराचा समारोप बुधवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विशेष मार्गदर्शनाने होणार आहे. राहुल गांधी साडेचार तास शिबिरस्थळी उपस्थित राहणार आहेत. या दहा दिवसीय शिबिरात सर्व जिल्हाध्यक्षांना दिल्लीहून आलेल्या खास प्रशिक्षकाकडून जपानी मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण देण्यात आले. या खेळात आधीपासूनच पारंगत असलेले राहुल गांधी**



**नवनियुक्त जिल्हाध्यक्षांसोबत मार्शल आर्ट्सचा सामना रंगवणार असल्याची माहिती आहे.**

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षणार्थींना देण्यात आलेले शारीरिक प्रशिक्षण. सर्व प्रशिक्षणार्थींना दररोज सकाळी पावणेसात वाजता मैदानावर उपस्थित राहावे लागत असे. सकाळी सात वाजता ध्वजवंदन झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी सभागृहात पोहोचत असत. राहुल गांधी यांचे प्रशिक्षक ‘अरुण’ यांनी प्रशिक्षणार्थींना शारीरिक प्रशिक्षण दिले. ध्यानधारणेने प्रशिक्षणाची सुरुवात होत असे. सभागृहात विस्तीर्ण मॅटची व्यवस्था करण्यात आली असून, त्यावर प्रशिक्षणार्थींकडून जपानी मार्शल आर्ट्स या अहिंसक युद्धकलेचे प्रशिक्षण आणि शारीरिक कौशल्याचा सराव करून घेण्यात आला.

काँग्रेसचे संघटन सक्षम, प्रभावी आणि जनतेशी थेट जोडणारे करण्याच्या उद्देशाने गंगापूर धरण येथील एमटीडीसी रिसॉर्टमध्ये हे निवासी प्रशिक्षण शिबिर सुरू आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह राज्यातील ७८ नवनियुक्त जिल्हाध्यक्ष शिबिरात सहभागी झाले आहेत. त्यात चार महिलांचाही समावेश आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रशिक्षण (पान २ वर)

# ११ हजार विद्यार्थ्यांचे अपार आयडी लिंकिंग अपूर्ण

## प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्यास परीक्षेला मुकावे लागणार

वृत्तसंस्था । मुंबई



**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मुंबई विद्यापीठाअंतर्गत परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरताना वैध एबीसी आयडी वा अपार आयडी नमूद करणे बंधनकारक केले आहे.**

अद्यापपर्यंत मुंबई विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी ११ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी आपला एबीसी आयडी/अपार आयडी विद्यापीठाच्या पोर्टलशी जोडलेला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र प्रसिद्ध केले जाणार नाही. परिणामी, या विद्यार्थांना परीक्षेपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी तातडीने आपला आयडी लिंक करावा, असे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे. (पान २ वर)

# संपादकीय

## तरुण पिढीने दिलेल्या लढ्याचे निर्विवाद यश

कोणताही मोठा नेता किंवा राजकीय पाठबळाविना उभ्या राहिलेल्या या लढ्यातूनच भविष्यात समाजाच्या समस्या सोडवण्याची प्रेरणाही त्यातून मिळाली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. पुणे, नाशिक आणि नागपूरसह राज्यभरात विविध ठिकाणी केलेल्या उपोषण-आंदोलनांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केलेल्या मागण्या, हे आदिवासींच्या तरुण पिढीने दिलेल्या लढ्याचे निर्विवाद यश आहे. सरकारने घातलेल्या जाचक अटी-नियमांमुळे हजारो आदिवासी विद्यार्थ्यांना बंद होऊ पाहणारे उच्च शिक्षणाचे दरवाजे या तरुणांनी आपली जिद्द आणि निर्धाराच्या बळावर उघडले आहेत. मात्र, आपले हे हक्क मिळवण्यासाठी या विद्यार्थ्यांना १७ दिवस उपोषण करावे लागले आणि गडचिरोलीतील आश्रमशाळेत तीन मुलींचा साप चावून मृत्यू झाला, हे दुर्दैवी आहे. आदिवासी समाजाकडे पाहण्याचा व्यवस्थेचा दृष्टिकोन आणि आश्रमशाळांमधील मूलभूत सुविधांचीही होणारी परवड या आंदोलनातून समाजापुढे आली आहे. या विद्यार्थ्यांनी दिलेल्या जय उलगुलान या घोषणेतून गेल्या शतकाच्या प्रारंभी भगवान बिरसा मुंडा यांनी जुलमी कायदे व शोषणाविरुद्ध दिलेल्या लढ्याची आठवण आली. रडल्याविना आईचेही लक्ष लहान मुलाकडे जात नाही, या जुन्या म्हणीचे प्रत्यंतर आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पुन्हा एकदा आले. दुर्गम भागांतील या गोरगरीब आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक-कौटुंबिक समस्या किंवा रोजगारासाठी शिक्षण सोडण्याची पाळी येते, हे वास्तव सरकारी बाबूंनी लक्षात घेतले नव्हते. त्यातच गडचिरोली येथील आश्रमशाळेत साप चावून तीन मुलींचा मृत्यू झाल्याने मूलभूत सुविधांचा प्रश्न पुढे आला आणि आंदोलन भडकले. अन्य आंदोलनांप्रमाणेच सरकारचे या विषयाकडेही प्रारंभी दुर्लक्षच झाले. आदिवासी विकासमंत्री अशोक उइके यांनी दबाव आणण्याचे प्रयत्न केले; तसेच विरोधकांच्या जाळ्यात फसू नका, म्हणून राजकीय रंग देण्याचेही प्रयत्न झाले. मात्र, उच्च न्यायालयाने एकाही विद्यार्थ्याचा जीव जाता कामा नये, असे बजावल्यानंतर सरकारदरबारी हालचाली झाल्या आणि मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सर्व मागण्या मान्य झाल्या. त्यानुसार हे वादग्रस्त ङ्गजीआरफमागे घेण्यात येणार आहेत; तसेच थेट खात्यांत पैसे देण्याऐवजी भोजनाचीही व्यवस्था होईल. केवळ आदिवासीच नव्हे, तर सर्वच खात्यांमध्ये थेट खात्यात पैसे टाकून प्रत्यक्ष सुविधा देण्याच्या जबाबदाऱ्यांमधून अंग काढून घेण्याच्या नव्या सरकारी खाक्याचाच फेरविचार करण्याची वेळ आता आली आहे. हे आंदोलन केवळ वसतिगृहासारख्या सुविधा किंवा भत्त्यांच्या मागणीपुरते मर्यादित नाही. त्यास व्यवस्थेच्या अन्यायाविरोधात आपल्या हक्कांसाठी उभारलेला स्वाभिमानाचा लढा म्हणावा लागेल. जंतर-मतरवरील आंदोलनामधून केवळ धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला नाही, तर देशभरातील नव्या पिढीला त्यातून लढण्याची प्रेरणा मिळाली. रांचीमधील आंदोलन, राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील पेपरफुटीसारखी अनेक आंदोलने ठिकठिकाणी उभी राहत आहेत, त्याकडे राजकीय चष्म्यातून न बघता या पिढीतील अस्वस्थतेचा व्यवस्थेने विचार करावा. या समाजातील विद्यार्थी शिक्षणबाह्य होण्याचे प्रमाण ३५ टक्के असून जेमतेम दहा टक्के विद्यार्थीच पदवी-पदव्युत्तर शिक्षणापर्यंत पोहोचू शकतात, हे वास्तव लक्षात घेतले तर पुढील खडतर प्रवासाची जाणीव होईल. दुसरीकडे या खात्यातील कर्मचाऱ्यांची ३० टक्के, तर आश्रमशाळांमधील शिक्षकांची हजारो पदे रिक्त आहेत. प्रामुख्याने आश्रमशाळा व अन्य योजनांमध्ये नोकरशाही आणि कंत्राटदारांचे साटेलोटे व भ्रष्टाचाराची साखळी मोडून काढण्याचे मोठे आव्हान आहे. त्यापलीकडे जाऊन व्यवस्थेकडून उपकार केल्याच्या थाटात सोयी-सुविधा देण्यापेक्षा हक्कांचा भाग म्हणून त्यांची अंमलबजावणी व्हावी, हा या आंदोलनाचा सर्वांत मोठा धडा आहे.

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित

## वालंबा ग्रामपंचायत अंतर्गत विविध पाडे दुर्लक्षित; धडक मोर्चा काढण्याचा युवा क्रांती संघटनेचा इशारा

प्रतिनिधी | अक्कलकुवा

**तालुक्यातील वालंबा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या निंबापाटी परिसरासह विविध पाड्यांमध्ये स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही मूलभूत सुविधांचा भीषण अभाव दिसून येत आहे. रस्ते, पिण्याचे पाणी, स्मशानभूमी, वीज, आरोग्य आणि शाळा यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या व जीवनमरणाशी जोडलेल्या प्रश्नांमुळे येथील आदिवासी बांधवांचे जगणे अत्यंत असह्य झाले आहे. प्रशासनाकडून सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षाच्या विरोधात आणि या सर्व प्रलंबित समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी युवा क्रांती, नंदुरबार या सामाजिक संघटनेच्या वतीने अक्कलकुवा पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.**



वालंबा ग्रामपंचायतीमधील विविध पाड्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. निंबापाटी येथील पाटीलपाडा येथे पिण्याच्या पाण्याची कोणतीही कायमस्वरूपी सोय नसल्यामुळे येथील महिला व ग्रामस्थांना पाण्यासाठी थेट नदीच्या पात्रात उतरावे लागत आहे. याशिवाय पाटीलपाडा, राऊतपाडा आणि माथाकुंडपाडा या तिन्ही ठिकाणी स्वतंत्र स्मशानभूमीच उपलब्ध नाही. त्यामुळे स्वातंत्र्यापासून आजतागायत उघड्यावरच अंत्यविधी करण्याची दुर्दैवी वेळ येथील ग्रामस्थांवर येत आहे. शिक्षण क्षेत्राची दुरवस्था पाहता, निंबापाटी गावांतर्गत येणाऱ्या पाटीलपाडा, राऊतपाडा, माथाकुंडपाडा व गालीडोंगपाडा येथील मुले राऊतपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत शिकतात. मात्र, ही शाळा गेल्या अनेक वर्षांपासून जीर्ण झाल्यामुळे नादुरुस्त दाखवून पाडण्यात आली आणि नवीन इमारत मंजूर झाली. परंतु प्रशासकीय दिरंगाईमुळे ही इमारत अद्याप अपूर्ण असल्याने लहान मुलांना अंगणवाडीच्या दाटीवाटीच्या इमारतीत बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.

दळणवळणाचा विचार केला असता, माथाकुंडपाडा ते राऊतपाडा, गालीडोंगपाडा आणि चपलाईपाडा येथील रस्त्यांचे काम केवळ खोदकाम करून अर्धवट सोडून देण्यात आले आहे. पावसाळ्यात येथे प्रचंड चिखल होत असल्याने वाहने अर्ध्या रस्त्यातच सोडून लोकांना पायी प्रवास करावा लागतो. या दळणवळणाच्या अभावामुळे गरोदर महिला व गंभीर रुग्णांना बांबूची झोळी करून रुग्णालयात न्यावे लागते; तर वेळेवर उपचार न मिळाल्याने काही रुग्ण दगावल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत. तसेच ढाडीपाडा येथे रस्त्याचे काम अपूर्ण असून नदीवर पूल बांधण्यात आलेला नाही. त्यामुळे पावसाळ्यात पुरामुळे या पाड्याचा संपर्क पूर्णपणे तुटतो आणि गावात एखादी दुर्दैवी घटना घडल्यास नातेवाइकांनाही येणे अशक्य होते.

या व्यतिरिक्त, वीज पुरवठ्याच्या बाबतीत राऊतपाडा येथे वीज कंपनीने फक्त दोन तारा टाकून काम पूर्ण झाल्याचा बनाव केला आहे. वारंवार वीज जात असल्याने रात्रीच्या वेळी हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. चपलाईपाडा येथे ट्रान्सफॉर्मर (डीपी) व हातपंप गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहेत आणि उमरपाडा येथे अनेक घरांत अजून वीज पोहोचलेली नाही.

गालीडोंगपाडा येथे जल जीवन मिशनचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात गेला आहे. तसेच, पंचायत समितीमार्फत मिळणारे वैयक्तिक गोठ्यांचे थकीत अनुदानही लाभार्थ्यांना अद्याप मिळालेले नाही.

या सर्व गंभीर बाबींवर प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करावी यासाठी निवेदन सादर करण्यात आले. यावेळी निवेदन देताना युवा क्रांतीचे प्रदेश समन्वयक विजयसिंग पाडवी, जिल्हा आयटी सेल प्रमुख इंजि. अजय वसावे, अक्कलकुवा तालुकाप्रमुख धिरसिंग वसावे, मगन वसावे, शंकर वसावे, कांतीलाल वसावे, वीरसिंग वसावे, शैलेश वसावे, मेहुल वसावे, जयराम वसावे, विकास वसावे, राकेश वसावे, मानसिंग वसावे,राजेंद्र वसवे मिरदर वसावे, मिथुन वसावे, महेश वसावे सुनील , रमण वसावे, राहुल वसावे कल्पेश वसावे,जालमसिंग वसावे, दिलीप वसावे, विपुल वसावे,यांच्यासह विविध ग्रामपंचायतींचे युवा क्रांती ग्राम समिती अध्यक्ष, सर्व पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येत्या ७ दिवसांच्या आत प्रशासनाने या सर्व समस्यांवर ठोस उपाययोजना करून कामे सुरू न केल्यास युवा क्रांती संघटनेच्या वतीने अक्कलकुवा पंचायत समितीवर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा आक्रमक इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांना मध केंद्र योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी | नंदुरबार

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या निर्णयानुसार, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या मध केंद्र योजना अंतर्गत पात्र व्यक्ती, प्रगतशील शेतकरी व संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ सुशिक्षित बेरोजगार, शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी राजेश गवांदे यांनी केले आहे. अधिक माहिती व अर्जासाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, नंदुरबार येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दोन महत्त्वाच्या गावांना जोडणाऱ्या फरशी पुलाची दुरवस्था

## माजी सभापती गणपत चौरे यांनी केली दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी | धुळे

**पिंपळनेर तालुक्यातील मंडाणे व बल्हाणे या दोन महत्त्वाच्या गावांना जोडणाऱ्या फरशी पुलाची दुरवस्था दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनली आहे. पुलाचा मोठा भाग खचला असून काठावरील सिमेंट-काँक्रीटचा भराव पूर्णपणे उखडून वाहून गेला आहे. त्यामुळे पुलाला मोठी भगदाडे पडली असून हा पूल प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे.**

पुलाचा एक तृतीयांश भाग थेट नदीत कोसळण्याच्या स्थितीत आहे. खालून पाणी वाहत असल्याने आणि सुरक्षेसाठी कठडे किंवा संरक्षक भिंत नसल्याने लहान मुले व नागरिक अत्यंत धोक्याच्या परिस्थितीत यावरून ये-जा करत आहेत. रात्रीच्या वेळी किंवा पहाटेच्या अंधारात अथवा पावसाच्या संततधारेत चालकाचा अंदाज किंचितही चुकला, तर एखादे वाहन थेट खाली कोसळून मोठी जीवितहानी होण्याची घटना नाकारता येत नाही. साक्री



तालुक्यातील मंडाणे ते बल्हाणे रस्त्यावर फरशी पुलाची झालेली दुरवस्था.या पुलाच्या अत्यंत भयानक स्थितीमुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अवजड व मोठ्या वाहनांची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. या वाहनांना आता पारगावमार्गे लांबचा फेरा मारून जावे लागत आहे. यामुळे नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांचा अतिरिक्त वेळ व इंधन वाया जात आहे.

या पार्श्वभूमीवर माजी सभापती गणपत चौरे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत तीव्र असंतोष व्यक्त केला आहे. हा फरशी पूल प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी संबंधित प्रशासनाने निद्रावस्था सोडून तातडीने या पुलाचे नवीन व भक्कम बांधकाम सुरू करावे, अशी आग्रही मागणी माजी सभापती गणपत चौरे यांनी केली आहे.

# पान १ वरुन

**समृद्धी महामार्गावरील......**

टोळक्याने तक्रारदारासह कुटुंबीयांना मारहाण केली. त्यांच्याकडील १८ लाख नऊ हजारांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. यावेळी पाठीमागून येणाऱ्या अन्य गाड्याही अडवून लाकडी दांडक्याने मारहाण करीत रोख रक्कम काढून दरोडा टाकला होता. या प्रकरणी वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीण पोलिसांनी विविध पथके तयार करून तपासाची चक्रे फिरवली. स्थानिक गुन्हे शाखा आणि वावी पोलीस ठाण्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. समृद्धी महामार्ग परिसरातील घटनास्थळावरील सीसीटीव्ही चित्रण आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सखोल तपास केला असता, संशयित हे धाराशिव जिल्ह्यातील असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले. पथकांनी १५० ते २०० किलोमीटर अंतरावरील सीसीटीव्ही चित्रणाची पडताळणी करून हा गुन्हा उघडकीस आणल्याचे पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी यांनी नमूद केले. नाशिक ग्रामीण पोलिसांची चार पथके धाराशिव जिल्ह्यात धडकली. तेथे पथकांनी धाराशिव पोलिसांच्या मदतीने रात्रभर पाळत ठेवून एकाचवेळी छापा टाकला. या कारवाईत धाराशिव येथील नितीन उर्फ सुनील शिंदे (३४, खामकरवाडी, वाशी), गोविंद पवार (१९, लक्ष्मीपीठ, वाशी), अशोक शिंदे (३७, खामकरवाडी, वाशी), अर्जुन पवार (५५, येरमाळा, कळंब), धनाजी पवार (२२, येरमाळा, कळंब), लखन काळे (२२, खामकरवाडी, वाशी) आणि गोविंद उर्फ रामा पवार (५०, उमरा, कळंब) यांना अटक करण्यात आली. संशयितांनी समृद्धी महामार्गावर रात्री पाळत ठेवून, वाहनांच्या पुढे लोखंडी वस्तू टाकून ती थांबवून लुटमार केल्याची कबुली दिली आहे.

**पीओपी मूर्तींच्या......**

१४ आणि २० ऑगस्टच्या आदेशांनंतर त्या सूचनाच अंतिम निकालापर्यंत लागू राहतील, असे राज्य सरकारने आता स्पष्ट केले आहे. पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत रोहित जोशी व इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर उच्च न्यायालयात गेल्या काही आठवड्यांपासून सुनावणी सुरू होती. १४ ऑगस्ट रोजी युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला. त्या वेळी अंतिम निर्णय होईपर्यंत न्यायालयाच्या परवानगीशिवाय पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करता येणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तोंडावर मंडळे, मूर्तिकार आणि प्रशासनापुढे विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने न्यायालयाकडे यंदाच्या गणेशोत्सवासाठी नियम स्पष्ट करण्याची विनंती केली. त्यानंतर २० ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाने गतवर्षीचा २४ जुलै २०२५ चा आदेश अंतिम निकाल होईपर्यंत लागू राहील, असे स्पष्ट केले. त्यानुसार सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्ती कृत्रिम जलसाठ्यांमध्ये, तर त्यापेक्षा उंच मूर्ती नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जित करता येणार आहेत.

**साखर कारखान्याकडून......**

खेटे मारावे लागत आहेत. कारखान्याचे कृषी अधिकारी आणि संचालकांशी मोबाईलवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कोणताही प्रतिसाद मिळत नाहीत. कारखाना व्यवस्थापनाच्या या बेजबाबदार आणि पलायनवादी भूमिकेमुळे शेतकरी रडकुंडीला आले आहेत.

**राहुल गांधींचा......**

विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित या शिबिरात प्रशिक्षणार्थींना सैद्धांतिक, मानसिक आणि शारीरिक प्रशिक्षणासह रागावर नियंत्रण मिळवण्याचे धडे देण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान केवळ शारीरिक कसरतींवर भर न देता शरीरासोबत मन शांत ठेवणे, आत्मनियंत्रण राखणे आणि रागावर नियंत्रण कसे मिळवायचे, याचेही धडे देण्यात आले. काँग्रेसचे शहराध्यक्ष निलेश (बबलू) खैरे यांनी ही माहिती दिली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बुधवारी शिबिराच्या समारोप कार्यक्रमासाठी नाशिकमध्ये दाखल होणार आहेत.

**११ हजार विद्यार्थ्यांचे......**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्रेडिट्सचे डिजिटल स्वरूपात संकलन, संचयन, हस्तांतरण व पडताळणी करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने एबीसी आयडी/अपार आयडी अनिवार्य केले आहे. त्यामुळे परीक्षेचा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना एबीसी आयडी/अपार आयडी लिंक करण्याच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. विविध परिपत्रकांद्वारे विद्यार्थ्यांना एबीसी आयडी/अपार आयडी तयार करून पोर्टलशी जोडण्याचे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

## धुळ्यात कीटकनाशक फवारणी मोहीम

प्रतिनिधी | धुळे

महिन्याभरापासून पावसाने मारलेली दंडी आणि वातावरणात सातत्याने होणाऱ्या बदलांमुळे धुळे शहरात डासांचा प्रादुर्भाव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. यामुळे शहरात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला असून, ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांच्या या वाढत्या आरोग्यविषयक तक्रारींची गंभीर दखल घेत महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरात धुरळणी आणि कीटकनाशक फवारणीच्या मोहिमेला धडक सुरुवात केली आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि डासांची पैदास रोखली जावी यासाठी महापालिकेमार्फत प्रभागनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. शहरातील प्रत्येक प्रभागातील गल्लीबोळ, सखल भाग, उघडी गटारे आणि जिथे पाणी साचण्याची शक्यता आहे अशा सर्व ठिकाणी फॉगिंग मशीनद्वारे धुरळणी केली जात आहे.

# महाराष्ट्र-मध्यप्रदेशाला जोडणाऱ्या रस्त्यावर काटेरी झुडपे

प्रतिनिधी | नंदुरबार

**शहादा तालुक्यातील खरगोन ग्रामपंचायत हद्दीतील बहिरपूर शिवार ते खरगोनमार्गे मध्यप्रदेशाच्या सीमेलगत जाणाऱ्या सुमारे चार किलोमीटर रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वाढलेली काटेरी बाभूळ व झुडपे तातडीने हटवावीत. अशी मागणी खरगोन ग्रामपंचायतीच्या सरपंच आंबीबाई लोटन रावताळे यांनी केली आहे. याबाबत शहादा पंचायत समितीच्या उपअभियंत्यांना निवेदन देण्यात आले.**

रस्त्याच्या साईडपट्टघांमध्येही गवत व झुडपांची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने रस्त्याची रुंदी कमी झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अपघात टाळण्यासाठी ही झुडपे हटविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या मागणीसाठी सरपंच आंबीबाई लोटन रावताळे, शिवसेनेचे युवा पदाधिकारी अनिल रावताळे, उपसरपंच दिनेश हिम्मत पावरा यांनी पुढाकार घेतला आहे. खरगोन ते मध्य प्रदेश शिवाराला जोडणारा हा जवळचा मार्ग असल्याने या रस्त्यावर



नेहमीच वाहनांची वर्दळ असते. परिसरातील नागरिक, शेतकरी तसेच विविध कामानिमित्त महाराष्ट्रातून मध्य प्रदेशाकडे आणि मध्य प्रदेशातून महाराष्ट्राकडे ये-जा करणाऱ्यांसाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. त्यामुळे रस्त्याची सद्यःस्थिती लक्षात घेऊन संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत मंजूर करण्यात आलेल्या अधिकृत ठरावाची प्रतही जोडण्यात आली आहे.

# भडगाव तहसील कार्यालयातील महसूल सहायकांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी | भडगाव

**भडगाव तहसील कार्यालयातील महसूल सहायक महादू मच्छिंद्र कोळी यांच्या बदलीनंतर झालेल्या नियुक्तीवरून तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बदली आदेश निर्गमित झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला आदेशानुसार अपेक्षित कामकाज न देता अन्य महत्त्वाच्या टेबलची जबाबदारी देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे बदली आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी नेमकी कशी झाली? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भातील नियमानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महादू कोळी यांच्या बदलीबाबत आदेश काढण्यात आला आहे. या आदेशात त्यांच्या बदलीसंदर्भातील कार्यालय व पदाची नोंद असून, संबंधित कर्मचाऱ्याला कार्यमुक्त करून नवीन जबाबदारीवर रुजू करण्याचे निर्देश असल्याचे सांगण्यात येते. मात्र, बदली आदेशातील नोंद आणि प्रत्यक्ष टेबल वाटप यामध्ये तफावत असल्याची चर्चा तहसील कार्यालयात सुरू आहे.

महादू कोळी यांची संजय गांधी निराधार योजनेशी संबंधित टेबलवर नियुक्ती झाल्याची चर्चा असताना, प्रत्यक्षात त्यांना त्या ठिकाणी न ठेवता गौण खनिजाशी संबंधित कामकाजाची जबाबदारी देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. गौण खनिज विभागातील कामकाज महसूल प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे व संवेदनशील मानले जाते. त्यामुळे बदलीनंतर संबंधित कर्मचाऱ्याला गौण खनिज टेबल देण्याचा निर्णय नेमक्या कोणत्या प्रशासकीय आदेशानुसार घेण्यात आला, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.




जिल्हाधिकारी कार्यालयाचा बदली आदेश एक आणि तहसील स्तरावरील प्रत्यक्ष टेबल वाटप वेगळे, असे चित्र असल्यास त्यामागील प्रशासकीय कारण काय, याचा खुलासा होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. या संपूर्ण प्रकरणात बदली आदेश, कार्यमुक्ती आदेश, रुजू आदेश, टेबल वाटपाचा आदेश आणि गौण खनिज टेबल देण्यामागील प्रशासकीय कारण यांची वस्तुनिष्ठ पडताळणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने अधिकृत कागदपत्रांच्या आधारे खुलासा केल्यास सध्या सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळू शकतो. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय या प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, याकडे आता भडगावकरांचे लक्ष लागले आहे. बदली झाली, पण बदलीचा उद्देश साध्य झाला का? हा प्रश्न मात्र सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१८८६ : थोर समाजसेवक, शिक्षक व साहित्यिक श्री.म.माटे यांचा जन्म.
१९४५ : जपानने माघार घेतल्याने दुसरे महायुध्द संपुष्टात आले.
१९७६ : ज्येष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर यांचा स्मृतिदिन.
२०११ : संगीतकार श्रीनिवास खळे यांचा स्मृतिदिन.

## थोडक्यात

### दिव्यांगांसाठी सहाय्यक साहित्य वाटपाकरिता तपासणी शिबिर

**जळगाव।** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत एडिप योजनेतून तसेच खासदार स्मिता वाघ यांच्या प्रयत्नातून भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिमको) यांच्या वतीने जळगाव लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग व्यक्तींना सहाय्यक साहित्य वाटप करण्यात येणार आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांची तपासणी व मोजमाप करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २ सप्टेंबर रोजी इंद्रा भवन, स्वामीनारायण मंदिरामागे, अमळनेर येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत तपासणी शिबिर होणार आहे. शिबिरासाठी यूडीआयडी कार्ड व दिव्यांगत्व प्रमाणपत्राची मूळ व छायांकित प्रत, आधारकार्डची छायांकित प्रत, उत्पन्नाचा दाखला आणणे आवश्यक आहे. दिव्यांग बांधवांनी शिबिरास आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन खासदार स्मिता वाघ व जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शहरात १४ किलो प्लॅस्टिक जप्त

**जळगाव ।** शहरात बंदी असलेल्या सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर आणि विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर महापालिका आरोग्य व स्वच्छता विभागाने आक्रमक कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेत तब्बल १२ किलो प्लॅस्टिकचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित दुकानदारावर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# ओव्हरब्रिज दुरुस्तीस्थळी निष्काळजीपणा; कंपनीच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा

## अपघातात एकाचा बळी ; रिफ्लेक्टीव्ह बोर्ड, बॅरिकेडिंग आणि धोक्याचे ब्लिंकर्स नसल्याचा आरोप

प्रतिनिधी । जळगाव

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील पाळधी ते तरसोद बायपास रस्त्यावर खचलेल्या ओव्हरब्रिजच्या दुरुस्तीच्या ठिकाणी सुरक्षेची कोणतीही काळजी न घेतल्याने रविवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रक व तवेरा वाहनाची धडक होऊन एक जण ठार, तर चौघे जखमी झाले. या प्रकरणी ठेकेदार 'ॲरो इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स' कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शैलेंद्र सिंघल, जी.एम. दत्ता यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध जळगाव तालुका पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिस अंमलदार अजय भोई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पाळधी ते तरसोद फाटादरम्यानच्या नवीन रस्त्याचे व ओव्हरब्रिजचे बांधकाम ॲरो इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने केले आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये हे काम पूर्ण झाले. कराराच्या अटींनुसार पुढील तीन वर्षे रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कंपनीची होती.

मात्र, पहिल्याच पावसात रस्ता खचल्याने कंपनीने दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. त्यासाठी एक लेन बंद करून दुसरीकडून वाहतूक सुरू ठेवण्यात आली होती.



कामाच्या ठिकाणी 'काम सुरू आहे', असे दर्शविणारे कोणतेही रिफ्लेक्टीव्ह बोर्ड, बॅरिकेडिंग, धोक्याचे ब्लिंकर्स अथवा रात्रीच्या वेळी वाहनचालकांना सावध करण्यासाठी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आला नव्हता, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

याप्रकरणी जळगाव तालुका पोलिसांनी ॲरो इन्फ्राचे एमडी शैलेंद्र सिंघल, जी.एम. दत्ता व संबंधित साईट अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५, २९०, ३(५) तसेच मोटार वाहन कायदा व सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदविला आहे. या घटनेमुळे महामार्गावरील दुरुस्तीच्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

**रविवारी रात्री सुमारे २ वाजता बायपासवर दुरुस्ती सुरू असलेल्या लेनवर ट्रक (क्रमांक एमएच ०५ डीके ५३९४) आणि तवेरा (क्रमांक एमएच ४८ पी ०७५५) यांची धडक झाली. या अपघातातील शांताराम केशव पाटील (वय ५८, रा. शेंदखेडा) हे गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. रामचंद्र ईश्वर महाजन यांच्यासह अन्य चौघे जखमी झाले आहेत.**

# १२ मीटरपेक्षा रुंद रस्त्यांवर फूटपाथ उभारा : माजी नगरसेवक पृथ्वीराज सोनवणे

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरातील १२ मीटरपेक्षा अधिक रुंदीच्या सर्व प्रमुख रस्त्यांवर सुरक्षित, सलग आणि अतिक्रमणमुक्त फूटपाथ तातडीने उभारण्यात यावेत, अशी मागणी माजी नगरसेवक पृथ्वीराज सोनवणे यांनी जळगाव शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

शहरात रस्त्यांचे रुंदीकरण, काँक्रिटीकरण आणि डांबरीकरणाची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असताना पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असल्याचे सोनवणे यांनी निवेदनात नमूद केले आहे. वाहनांची वाढती वर्दळ, भरधाव वाहने, अनधिकृत पार्किंग, हातगाड्या तसेच दुकानदारांचे अतिक्रमण यामुळे नागरिकांना अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

टॉवर चौक ते अजिंठा चौफुली, चित्रा चौक ते गणेश कॉलनी, रेल्वे स्टेशन परिसर ते महाबळ परिसर, संपूर्ण रिंग रोड तसेच सुभाष चौक ते डी-मार्ट परिसर यांसह शहरातील इतर सर्व १२ मीटरपेक्षा अधिक रुंदीच्या प्रमुख रस्त्यांवर नियोजनबद्ध फूटपाथ उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. फूटपाथ बांधल्यानंतर त्यावर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून नियमित तपासणी आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

फूटपाथवर वाहनांचे पार्किंग, हातगाड्या किंवा व्यावसायिक अतिक्रमण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. नवीन रस्ते, रस्ते रुंदीकरण आणि काँक्रिटीकरणाच्या कामांना मंजुरी देताना फूटपाथ, पादचारी सुरक्षा, पावसाच्या पाण्याचा निचरा तसेच दिव्यांगांसाठी आवश्यक सुविधांचा अनिवार्य समावेश करावा. फूटपाथची तरतूद नसलेल्या प्रमुख रस्त्यांच्या आराखड्यांना भविष्यात मंजुरी देऊ नये, अशीही मागणी सोनवणे यांनी केली आहे.

अस्तित्वातील खराब, तुटलेले किंवा अतिक्रमित फूटपाथ तातडीने दुरुस्त करून नागरिकांसाठी खुले करावेत आणि अतिक्रमणाविरोधात सातत्यपूर्ण व पक्षपातविरहित कारवाई करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि लहान मुलांना सुरक्षित पादचारी मार्ग मिळणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे, असे सोनवणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# तक्रार निवारण समिती सदस्यपदी गुलाबराव वाघ, समीर भाटिया यांची नियुक्ती

प्रतिनिधी । धरणगाव



**धरणगाव नगरपरिषदेच्या तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीवर गुलाबराव रतन वाघ आणि समीर सुभाष भाटिया यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**

या समितीचे अध्यक्षपद दिवाणी न्यायाधीशांकडे असून, सदस्य म्हणून दोघांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे शहरासह जिल्हाभरातून स्वागत होत आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून नागरिकांच्या विविध तक्रारी, समस्या तसेच स्थानिक पातळीवरील विवादांचे योग्य पद्धतीने निराकरण करण्याच्या दृष्टीने तक्रार निवारण व विवाद समितीला विशेष महत्त्व आहे.

नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, तक्रारींची योग्य दखल घेणे तसेच संबंधित प्रकरणांमध्ये नियमानुसार योग्य तोडगा काढण्यासाठी समितीची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. गुलाबराव वाघ आणि समीर भाटिया यांचा सार्वजनिक जीवनातील अनुभव, नागरिकांशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क आणि विविध सामाजिक व प्रशासकीय विषयांची जाण यामुळे समितीच्या कामकाजाला निश्चितच बळ मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, व्यावसायिक व नागरिकांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# पोलिसबांधवांसोबत फिनिक्स सोशल ग्रुपने साजरी केली रक्षाबंधन



प्रतिनिधी । अमळनेर

**पोलिस बांधवांना अतूट नात्याचा धागा बांधत फिनिक्स सोशल अवेअरनेस ग्रूपच्या महिला सदस्यांनी अनोखे रक्षाबंधन साजरे करत बहिणीची भूमिका निभावली.**

दिवसरात्र एक करून नागरिकांच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलीस बांधवांचे अमळनेर येथील फिनिक्स सोशल अवेरनेस ग्रुप गेल्या अनेक वर्षापासून अमळनेर पोलीस स्टेशनला रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करत असतात. यावर्षी ग्रुपच्या अध्यक्ष ॲड.ललिता पाटील, वसुंधरा लांडगे, डॉ. प्रतिभा मराठे, सुचिता पाटील, लता पाटील यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम आणि सर्व पोलीस बांधवांचे औक्षण करत राखी बांधली व रक्षाबंधनासारखा पवित्र सण पोलीस बांधवांसोबत साजरा केला.

# संगीत सभेत श्रोते मंत्रमुग्ध

प्रतिनिधी । जळगाव

साई सेवा मंडळ आयोजित मासिक संगीत सभेत अंजली धुमाळ यांनी आपल्या सुश्राव्य गायनाने रसिका श्रोत्यांची मने जिंकली. शंकरा रागातील अत रंग भरे हा बडा तर शिव हर हर महादेव शंकर हया छोट्या ख्याल गायनाने मैफिलीस प्रारंभ केला. लागलासे ध्यास, खेळ मांडीयेला, ओम साई अशी सुंदर भक्तीगीते सादर करत अवघा रंग एक झाला या भैरवीने मैफिलीची सांगता झाली.

# तृतीयपंथीयांसाठी एकदिवसीय शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत तृतीयपंथीय व्यक्तींना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, महाबळ रोड, मायादेवी मंदिरासमोर, जळगाव येथे एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मतदान कार्ड, संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड, आभा कार्ड, आदी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत तृतीयपंथीय व्यक्तींनी उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण योगेश पाटील यांनी केले आहे.

# रोटरी ऐकण्याची, पाहण्याची नाही तर अनुभवण्याची गरज : डॉ. रश्मी शर्मा

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी ही संस्था केवळ ऐकण्याची, पाहण्याची नाही तर प्रत्यक्ष अनुभवण्याची गरज आहे असे डॉ. रश्मी शर्मा यांनी प्रतिपादन केले.**

रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल तर्फे गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये मेंबरशिप अँड न्यू क्लब डेव्हलपमेंट मंथ निमित्त नवीन सदस्य स्वागत कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्ष ॲड. केतन ढाके, मानद सचिव दीपक नाथानी, मेंबरशिप कमिटी चेअरमन विपुल पारेख यांची प्रमुख उपस्थिती होती.




या कार्यक्रमात प्रा. शिवानी देशमुख व प्राची चौधरी यांना शर्मा यांच्या हस्ते सदस्यत्व, रोटरी पिन प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना रश्मी शर्मा यांनी संघटनेसाठी सदस्य गरजेचे असतात. त्यात नवीन महिला सदस्य झाल्यामुळे त्यांच्या मल्टीटास्किंग व्यक्तिमत्त्वाचा अधिक फायदा होतो असे त्या म्हणाल्या. नवीन सदस्यांचा रोटरीला व रोटरीचा त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध प्रकारे फायदा होत असतो. नवीन सदस्यांच्या कार्याची माहिती विपुल पारेख यांनी दिली. स्वागत पल्लवी ढाके यांनी केले. परिचय राजेश चौधरी यांनी तर ॲड. रवींद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बहिणाबाई विद्यालयात विविध कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**हॉकीचे जादूगार, महान क्रीडापटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त बहिणाबाई माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त क्रीडागुणांना वाव देण्यासाठी विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.**

यावेळी मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांच्या हस्ते खो-खोच्या मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले क्रीडा शिक्षक संतोष पाटील यांनी विविध खेळांचे नियोजन व आयोजन केले. स्पर्धांमध्ये पंच म्हणून राजेश वाणी व संतोष पाटील यांनी जबाबदारी सांभाळली. संस्थेचे अध्यक्ष बंडू काळे आणि समन्वयक प्रतिभा खडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा क्रीडा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी विशाल पाटील, दिनेश चौधरी, सीमा चौधरी, स्वाती कोल्हे, डॉ. प्रतिभा राणे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. या क्रीडा महोत्सवात भावना जाधव, खुशी सोनवणे, मीनल महाले, रवींद्र बारी, रुद्र कोळी, रोशनी राठोड, नेहा बडगुजर, हर्षल पाथरवट, तेजश्री जगताप, रागिनी तडवी, नंदिनी पावरा, शुभम सपकाळे, योगेश सूर्यवंशी, प्रथमेश भोई या राज्य व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती रुजविण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि जिद्द, सक्षम व कर्तृत्ववान पिढीची आशादायी पावले ठरली.



# भटके विमुक्त समाजातील विद्यार्थी, नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा

## जळगाव येथे भटके विमुक्त दिवस साजरा; विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

प्रतिनिधी । जळगाव

**इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील सभागृहात भटके विमुक्त दिवसफ कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. भटके विमुक्त समाजाचा इतिहास, संघर्ष, सामाजिक विकासातील योगदान तसेच समाजातील विद्यार्थी व नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




प्रमुख पाहुणे मनोहर अंधाळे, सेवानिवृत्त प्राचार्य उपस्थित होते. प्रास्ताविकात विशाल राठोड, सहायक संचालक यांनी भटके विमुक्त दिनाचे महत्त्व विशद केले. तसेच विभागाच्या शैक्षणिक, सामाजिक योजना व पायाभूत सुविधा निर्मितीसाठीच्या योजना व विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी महाज्योती, वनार्टी तसेच वित्त व विकास महामंडळाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या योजनांचा लाभ भटके विमुक्त समाजातील विद्यार्थी, युवक व नागरिकांनी घेऊन शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती साधावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी विकास माळुकर यांनी आपल्या व्याख्यानातून भटके विमुक्त समाजाचा इतिहास, समाजाने केलेला संघर्ष आणि सामाजिक विकासातील योगदान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विजाभज आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी व भटक्या समाजातील लोककलावंतांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विभागाचे अधिकारी-कर्मचारी, भटके विमुक्त समाजातील मान्यवर व प्रतिनिधी, विद्यार्थी, पालक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शन व राष्ट्रगानाने करण्यात आली.

# नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाखांचे अनुदान द्या

प्रतिनिधी । भडगाव

**राज्य शासनाने यावर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची योजना जाहीर केली असून, नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली आहे. ही योजना शेतकरीहिताची असली तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी या प्रोत्साहनपर अनुदानात वाढ करून दोन लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी किसान सभेच्या वतीने कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे करण्यात आली आहे.**

कर्जमाफी मिळणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय मिळायला हवा, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वतीने पाचोरा-भडगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सेवानिवृत्त पीएसआय पी. ए. पाटील यांनी मागणी केली. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली जात आहे.

# वरणगावातील काटेरी झुडपेही व्हावी नामशेष

## वरणगावच्या नगराध्यक्षांनी भुसावळच्या प्रभारी नगराध्यक्षांना दिले होते निवेदन

प्रतिनिधी । वरणगाव

**वरणगावहून भुसावळ शहरात जाणाऱ्या – येणाऱ्या वाहनधारकांना वरणगाव रोडवरील खड्डे, अस्वच्छता, रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली काटेरी झुडपे आणि भटक्या कुत्र्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी वरणगावचे नगराध्यक्ष सुनील काळे यांनी भुसावळ नगरपरिषदेच्या प्रभारी नगराध्यक्षा शैलेजा नारखेडे यांना निवेदन देऊन उपाययोजना करण्याची मागणी केल्याने निवेदनाची दखल घेत पालिकेने वरणगाव रोडवरील काटेरी झुडपे नामशेष करण्याचे काम हाती घेतले आहे.**



वरणगाव शहर व परिसरातील बहुतांश नागरिकांना आपल्या वाहनांने भुसावळच्या बाजारपेठेत खरेदी – विक्री करण्यासाठी येणे – जाणे करावे लागते. मात्र, भुसावळ शहराशी जोडण्यात आलेल्या प्रमुख मार्गावरील वरणगाव रस्त्याची झालेली दुरवस्था, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेली काटेरी झाडे – झुडपांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. याबाबत नगराध्यक्ष काळे यांनी भुसावळ पालिकेच्या नगराध्यक्षा नारखेडे यांची भेट घेऊन नागरिकांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. यानंतर नगरपरिषदेने तत्काळ कार्यवाही करीत जेसीबीच्या सहाय्याने वरणगाव रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे दुभाजकांमधील काटेरी झुडपे हटविण्यास सुरुवात केली आहे.

### वरणगावातीलही काटेरी झुडपांचा नायनाट करावा

वरणगाव शहरात मार्गक्रमण करणाऱ्या जुन्या महामार्गावरील फुलगाव फाटा ते वरणगाव फॅक्टरी फाट्याजवळच्या साईबाबा मंदिराच्या मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूने काटेरी झुडपे वाढली आहेत. यामुळे मार्गक्रमण करणाऱ्या वाहनधारकांना तसेच सकाळ – संध्याकाळ भटकंती करणाऱ्या नागरिकांना या काटेरी झुडपांचा त्रास सहन करावा लागत आहे . त्याच प्रमाणे प्रभाग क्रमांक सहा व इतर भागात सुद्धा काटेरी झुडपे व पावसाळी गवताचा मोठ्या प्रमाणात वेढा पडला आहे . यामुळे प्रत्येक भागातील काटेरी झुडपे तसेच पावसाळी गवताचा नायनाट करण्यात यावा, अशी मागणी शिवसेनेचे शहर प्रमुख दुर्गेश बेदरकार यांनी केली आहे .

# धरणगावातील समस्यांवर महायुतीची मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा; डासांचा वाढता प्रादुर्भाव, डेंग्यूचा धोका

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील विविध नागरी समस्यांबाबत शिवसेना–भाजप महायुतीचे पदाधिकारी व नगरसेवक यांनी नवनियुक्त मुख्याधिकारी रोशन राजपूत यांची सदिच्छा भेट घेत चर्चा केली. यावेळी शहरातील वाढता डास व विषारी कीटकांचा प्रादुर्भाव, स्वच्छता, धूर फवारणी तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील अतिक्रमणाच्या समस्येकडे मुख्याधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले.**

शहरात सध्या डास व विविध विषारी कीटकांचे प्रमाण वाढले असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शहरात डेंग्यूसह इतर आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली असून, नगरपालिका प्रशासनाने तातडीने ई–फवारणी व धूर फवारणी करून स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. कोरोना काळात शहरात वेळोवेळी धूर फवारणी करण्यात येत होती. त्यासाठी वापरण्यात येणारे मशीन सध्या नेमके कुठे आहे, याची तपासणी करून उपलब्ध असल्यास त्याचा तात्पुरता वापर करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली. आधुनिक फवारणी मशीन उपलब्ध होईपर्यंत उपलब्ध साधनसामग्रीच्या माध्यमातून फवारणी व स्वच्छता करून नागरिकांना संभाव्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. सायंकाळी ६ ते रात्री ९.१० वाजेपर्यंत या परिसरात मोठ्या प्रमाणात लोटगाडीधारकांकडून अतिक्रमण केले जाते. त्यामुळे नागरिकांना पायी चालणेही कठीण होत असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## थोडक्यात

### चोपडा तालुका काँग्रेसतर्फे रुग्णांना फळवाटप

**चोपडा** । महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त चोपडा तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप करण्यात आले. प्रदेश उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे ॲड. संदीप पाटील, डॉ. स्मिता पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस करण्यात आली. या उपक्रमामुळे रुग्णांनी आनंद व्यक्त करत हर्षवर्धनजी सपकाळ यांना वाढदिवसाच्या मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

### जबलपूर–कोयंबतूर विशेष गाडीचे नियमित सेवेत रूपांतर

**भुसावळ ।** मध्य रेल्वेने जबलपूर ते कोयंबतूर दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांचे नियमित सेवेत रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन गाडी क्रमांकासह नियमित मेल, एक्सप्रेस गाड्या म्हणून धावणार असून, यामुळे सुविधा वाढण्यासोबतच रेल्वे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सध्या धावणाऱ्या गाडी क्रमांक ०२१९८/०२१९७ जबलपूर–कोयंबतूर विशेष गाडीचे पुढीलप्रमाणे नियमित सेवेत रूपांतर करण्यात येणार आहे : गाडी क्रमांक २०१६० जबलपूर–कोयंबतूर साप्ताहिक एक्सप्रेस दर शुक्रवारी जबलपूर येथून सुटेल. गाडी क्रमांक २०१५९ कोयंबतूर–जबलपूर साप्ताहिक एक्सप्रेस २६ आक्टोबरपासून दर सोमवारी कोयंबतूर येथून सुटेल. जबलपूर–कोयंबतूर साप्ताहिक एक्सप्रेस २३ आक्टोबरपासून दर शुक्रवार रोजी जबलपूर येथून २३.५० वाजता सुटेल.

# चोपडा तालुक्यात ३ हजार वृक्षांचे वाटप

## देवगिरी कल्याण आश्रम, सेवारथ संस्थेचा उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून देवगिरी कल्याण आश्रम, चोपडा व सेवारथ संस्था, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने चोपडा तालुक्यातील आदिवासी भागात तीन हजार केशर आंबा वृक्षांचे वाटप व वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.**

अभियानाचे उद्घाटन महाराष्ट्र वनभूषण पद्मश्री चैत्राम पवार यांच्या हस्ते मुळ्यावतार येथे उत्साहात झाले. यावेळी सेवारथ संस्थेच्या नीलिमा सेठीया व डॉ.अमित भंगाळे यांच्यासह येथील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. वृक्षांचे केवळ वाटप न करता त्यांचे भविष्यात योग्य संगोपन व संवर्धन व्हावे, यासाठी निवृत्त कृषी अधिकारी डॉ अनिल भोकरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. वृक्ष स्वीकारणाऱ्या प्रत्येक लाभार्थ्यांकडून प्रति वृक्ष नाममात्र केवळ २० रुपये शुल्क घेण्यात आले, जेणेकरून वृक्षाची किंमत समजून त्याचे जतन करण्याची भावना निर्माण होईल.

# एमआयडीसीत ११.१७ लाखांचा अमली पदार्थांचा साठा जप्त

## एफेड्रिनसह गांजा तस्करीचा पर्दाफाश; ३५ वर्षीय तरुण अटकेत

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यात अमली पदार्थांची तस्करी व विक्रीला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या धडक मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा आणि एमआयडीसी पोलिसांच्या संयुक्त पथकाने मोठी कारवाई केली.**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नारायणबाबा दर्ग्यासमोरील रस्त्यावर सापळा रचून पोलिसांनी एफेड्रिन व गांजा असा एकूण ११ लाख १७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नूर मोहम्मद अब्दुल सलाम पटेल (वय ३५, रा. रामनगर, मेहरुण ) याला ताब्यात



घेण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना एमआयडीसी परिसरातून काळ्या रंगाच्या मोपेडवरून एफेड्रिन या अमली पदार्थाची बेकायदेशीर वाहतूक केली जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी कारवाईची तयारी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या कायदेशीर परवानगीने तसेच राजपत्रित अधिकारी व पंचांच्या उपस्थितीत ३१ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ११.४० वाजता संबंधित रस्त्यावर सापळा रचण्यात आला. संशयित मोपेडवरून येताना दिसताच पोलिसांची चाहूल लागल्याने त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले.मोपेडच्या डिक्कीची पंचांसमक्ष झडती घेतली असता १ किलो ९६३ ग्रॅम एफेड्रिन, अंदाजे किंमत ९ लाख ८१ हजार ५०० रुपये, तसेच २ किलो ११४ ग्रॅम गांजा, अंदाजे किंमत १ लाख ५ हजार ७०० रुपये आढळून आला होता.

# मंगरूळ येथे शिक्षकांचे काळ्या फिती लावून आंदोलन

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील स्व. आबासो अनिल अंबर पाटील माध्यमिक व डॉ. अस्मिता प्रतापराव दिघावकर उच्च माध्यमिक विद्यालय, मंगरूळ येथे जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.**

दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर १००% अनुदानावर आलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी दि. १ ते ४ सप्टेंबर २०२६



या कालावधीत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काळ्या फिती लावून कामकाज करणार आहेत.

या आंदोलनाच्या पहिल्या दिवशी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील, अशोक सूर्यवंशी, प्रभुदास पाटील, संजय पाटील, राजेंद्र पाटील, सुषमा सोनवणे, शितल चव्हाण, सीमा मोरे, श्रुती पाटील, सीमा पाटील, वस्ती शाळेचे मुख्याध्यापक भटू पाटील, तसेच प्रविण पाटील, मनोज पाटील, सुदर्शन पवार, प्रदीप पाटील, खुशाल पाटील आदी मान्यवर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोपडा महाविद्यालयात खेळाडूंचा गौरव

## विद्यार्थ्यांनी आत्मसात केला निरोगी जीवनशैलीचा संदेश

प्रतिनिधी । चोपडा

**येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात जिमखाना विभागाच्या वतीने मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आंतरविद्यापीठ स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहूणे चोपडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवन देसले यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील क्रीडाचे महत्त्व विशद करताना शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना आणि निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्या प्रा.डॉ.संध्या सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.के.एन. सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.बी.एम.सपकाळ, डॉ. शैलेशकुमार वाघ, प्रभारी रजिस्ट्रार डी.एम. पाटील यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची माहिती देताना भारतीय हॉकीच्या सुवर्णकाळात त्यांनी बजावलेल्या भूमिकेचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद पाटील यांनी केले.

# अमळनेरात २० डिसेंबरला ऑल मुस्लिम समाजाचा सामूहिक विवाह सोहळा

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरातील ऑल मुस्लिम समाजातील वधू–वरांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सामूहिक विवाह सोहळा रविवार, दि. २० डिसेंबर रोजी इंदिरा गांधी भवन, अमळनेर येथे आयोजित करण्यात आला आहे. संस्थेचे अध्यक्ष हाजी मोना शेख यांच्या अध्यक्षतेखाली ११ जोडप्यांचे सामूहिक निकाह पार पडणार आहेत.**

या उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळत असून, विवाहाचा अनावश्यक खर्च कमी करून समाजातील गरजू वधू–वरांना सन्मानाने संसाराची सुरुवात करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. संस्थेच्या वतीने प्रत्येक वधू–वरास पलंग सेट, कपाट तसेच संसारोपयोगी वस्तू देण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक वधू–वराच्या कुटुंबातील शंभर–शंभर व्यक्तींच्या भोजनाची व्यवस्था संस्थेच्या वतीने करण्यात येते. या सामूहिक विवाह सोहळ्यात आपल्या मुला–मुलींची नावनोंदणी करू इच्छिणाऱ्या पालकांनी दि.१० नोव्हेंबरपर्यंत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# व्हॉईस ऑफ मीडिया महिला विंगची राज्य कार्यकारिणी जाहीर

## प्रदेशाध्यक्षपदी वैशाली पाटील; रोशनी बैस, सारिका शिंदे विभागीय प्रदेशाध्यक्षपदी

प्रतिनिधी । भुसावळ

**पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत महिला पत्रकारांना संघटनात्मक बळ, सुरक्षितता, सन्मान आणि सक्षम व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने व्हॉईस ऑफ मीडिया, महिला विंग महाराष्ट्र राज्याची प्रदेश कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.**

नारीशक्तीला संघटित करून पत्रकारितेतील महिलांच्या प्रश्नांना बुलंद आवाज देण्याचा निर्धार या नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून करण्यात आला आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून



वैशाली पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तसेच रोशनी बैस आणि सारिका शिंदे यांच्यावर विभागीय प्रदेशाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राज्याच्या सर्व विंगच्या प्रमुख असणाऱ्या रश्मी मारवाडी यांनी ही निवड केली. सविता चंद्रे यांनी अनुमोदन दिले आहे. व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रातील विविध विभागांत कार्यरत महिला पत्रकारांना एका सक्षम संघटनात्मक छत्राखाली आणून त्यांच्या हक्कांसाठी, सुरक्षिततेसाठी, सन्मानासाठी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी प्रभावीपणे काम करण्याचे धोरण महिला विंगने निश्चित केले आहे. राज्य महिला विंगच्या नव्या कार्यकारिणीत प्रदेशाध्यक्ष म्हणून वैशाली पाटील यांची तर विभागीय प्रदेशाध्यक्ष म्हणून रोशनी बैस आणि सारिका शिंदे यांची तसेच कार्याध्यक्ष म्हणून लक्ष्मी वाढेकर, उपाध्यक्ष म्हणून शुभांगी करने, महासचिव, रेणुका कोटम्बकर, सहसचिव ज्योती सरपाते, खजिनदार पल्लवी शेटे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# जानवे येथे अन्न व औषध प्रशासनाकडून दूध भेसळीचा पर्दाफाश

## एफडीए, पोलिसांची संयुक्त कारवाई ; दूध भेसळ करणाऱ्या एकाला अटक

प्रतिनिधी । अमळनेर

**गायीच्या दुधाचा फॅट वाढवून ते विक्रीसाठी पाठविण्याच्या उद्देशाने भेसळयुक्त मिश्रण तयार करणाऱ्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासन व अमळनेर पोलिसांनी संयुक्त छापा टाकून कारवाई केली. जानवे–इंदपिंप्री रस्त्यावरील पत्री शेडमध्ये ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी महेश दिलीप पाटील (वय २७) याला अटक करण्यात आली आहे.**

अमळनेर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना जानवे येथे दूध भेसळीचा



प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आकाश बोराडे यांच्याशी संपर्क साधून संयुक्त पथकाने जानवे–इंदपिंप्री रस्त्यावर कारवाई केली. दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास पत्री शेडची तपासणी केली असता महेश पाटील हा मिक्सरच्या साहाय्याने भेसळयुक्त मिश्रण तयार करताना आढळून आला. चौकशीत सुमारे १० लिटर भेसळयुक्त मिश्रण तयार करून ते १०० लिटर गायीच्या दुधात फॅट वाढविण्यासाठी मिसळले जात असल्याचे समोर आले. हे दूध धुळे येथे विक्रीसाठी पाठविले जात असल्याचेही तपासात निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान पोलिसांनी मिक्सर, सोयाबीन तेल, लोखंडी कॅन, गायीचे दूध व अन्य साहित्य जप्त केले. जप्त साहित्य तसेच दुधाचे नमुने पुढील तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासन अधिकारी आकाश बोराडे यांच्या फिर्यादीवरून महेश दिलीप पाटील याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील कलम २६ (१), २७ (३), ३१ (१), ३१ (२), ५९ तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम २७४, २७५, १२३, ३१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत FDA अधिकारी आकाश बोराडे, ऋषभ चव्हाण यांच्यासह अमळनेर पोलिसांचे पथक सहभागी झाले.

### आरोपी रंगहाथ जेरबंद


अमळनेर पोलिसांनी आरोपी महेश दिलीप पाटील (वय २७) याला अटक केली असून पुढील तपास हेडकॉन्स्टेबल सुनील जाधव करीत आहेत. या कारवाईमुळे दूध भेसळीविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# वरणगावनजीक ४० वर्षीय इसमाचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी । वरणगाव

**वरणगाव ते मुक्ताईनगर महामार्गावरील बोहर्डी उड्डाणपुलाखाली सोमवारी पहाटे सुमारे ४० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर इसमाचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाल्याने विविध चर्चांना उधाण आले आहे.**

घटनेची माहिती मिळताच वरणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. मृत इसमाची ओळख पटविण्याचे



### बोहर्डी उड्डाणपुलाखाली मृतदेह आढळला; पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद

काम पोलिसांकडून सुरू आहे.

या प्रकरणी वरणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. पोलिसांकडून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.